मध्यवर्ती भांडार विभाग,
जा.क्रं/मभा/२/कावि/२७८/२०१८,
दिनांक :-१५/०६/२०१८

विषय :- मुदतबाह्य आणि दावा न सांगितलेल्या ठेवी/अनामत रक्कमा व्यपगत करण्याबाबत.

परिपत्रक,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागातंर्गत विविध महसूली /भांडवली कामांसाठी ठेकेदार / पुरवठादारांकडून ठेव स्वरुपात /बँक गॅरंटी/डिमांड ड्राफ्ट व्दारे अथवा ऑनलाईन भरण्याव्दारे ठेव अनामत रकमा स्विकारण्यात येतात. निविदेत वाटप केल्यावर किंवा करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार तसेच संबधित कामाच्या समाधानकारकरित्या पुर्ततेवर आणि महानगरपालिकेस देय असलेल्या इतर रकमांची वसूली झालेबाबत पुर्ण खात्री पटल्यानंतर ठेकेदाराला सुरक्षा अनामत ठेव परत करण्यात येते. त्यानुसार परतावा योग्य ठेवींचा तीन पुर्ण लेखाकंन वर्षाकरीता दावा सांगण्यात आला नाही, तर अशा अनामत रकमा महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता २०११ मधील नियम २९९ नुसार व्यपगत होतात, आणि अशा व्यपगत रक्कमा मनपा निधीमध्ये स्थानांतरीत होणे आवश्यक आहे. यासंदर्भात मनपाचे तसेच स्थानिक लेखा निधी यांचे लेखा परिक्षणात आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत.

सबब परतावा योग्य असलेल्या व तीन पुर्ण लेखांकन वर्षाकरीता दावा सांगण्यात आला नाही तर अशा अनामत रकमा /ठेवी आपले टेबलचे कामकाजात असल्यास त्याबाबत वरील नियमानुसार दि.३०/६/२०१८ पर्यंत कार्यवाही करण्यात यावी. तसेच यापुढे अशा ठेवी अनामत रकमांबाबत वरील नियमानुसार वेळच्या वेळी कार्यवाही करण्यात यावी अन्यथा संबधित लिपिक /सहा.भांडारपाल यांना जबाबदार धरुन त्यांचे विरुद्ध कारवाई करणेत येईल याची कृपया नोंद घेणेत यावी.

सहाय्यक आयुक्त (भांडार)
पिंपरीचिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

प्रति,
सर्व लिपिक/सहा.भांडारपाल/भांडारपाल
मध्यवर्ती भांडार /औषध भांडार /यशवंतराव चव्हाण मेमो.हॉस्पीटल.